# भारत स्वातंत्र्यानंतरच्या काळातील भारतीय प्रशासनातील सुधारणांचा चिकित्सक अभ्यास

प्रा. सचिन ताराचंद धुर्वे सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग यशवंतराव चव्हाण (के. एम. सी.) कॉलेज कोल्हापूर

---

आधुनिक काळात लोकप्रशासन हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मानवाच्या मूलभूत गरजा भागविणे व मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास साध्य करणे हा राज्यसंस्थेचा प्रधान हेतू आहे. हा हेतू साध्य करण्यासाठी उत्तम अशा प्रशासनाची आवश्यकता असते. आधुनिक काळात मानवी गरजा, इच्छा, आकांक्षा वाढलेले आहेत. मानवाच्या गरजाची पूर्तता करण्यासाठी सक्षम व पारदर्शक लोक प्रशासनाची गरज आहे. लोकप्रशासन ही एक अविरत चालणारी प्रक्रिया आहे त्यामुळे काळानुसार प्रशासनात सुधारणा घडविणे आवश्यक असते. लोककल्याणकारी राज्यात राज्यसंस्थेपुढे अनेक आव्हाने उभे असतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध आव्हानांना सामोरे जाताना बदलत्या काळानुसार प्रशासकीय क्षमता अधिक व्यापक बनविणे आवश्यक असते. भारतीय संघराज्यात केंद्र आणि राज्य अशा दोन्ही स्तरांवर प्रशासकीय सुधारणेच्या समस्यांनी सतत लक्ष वेधून घेतले आहे. त्यामुळे भारत स्वतंत्र झाल्यापासून तर आज पर्यंत प्रशासकीय संरचनेत, कार्यपद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेला आहे. भारतीय प्रशासन व्यवस्थेत अत्याधुनिकता आणून देशाचा सर्वांगीण विकास साध्य करण्याचा प्रयत्न सुरू आहे. परंतु शासन स्तरावरील हा प्रयत्न अत्यंत संथ गतीने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील प्रशासकीय सुधारणाचे चिकित्सक विश्लेषण करणे. हा या संशोधन निबंधाचा मुख्य हेतू आहे.

**<u>संशोधनाचा उद्देश:</u>**

- भारतीतील प्रशासकीय सुधारणांचा अभ्यास करणे
- भारतातील प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या अहवालाची तरतुदींचा अभ्यास करणे
- भारतातील प्रशासकीय सुधारणांचा चिकित्सक अभ्यास करणे.

**<u>प्रशासकीय सुधारणा:</u>**

प्रशासकीय सुधारणा म्हणजे प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आणि रचनेत केलेले असे बदल, जे अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकहितकारी प्रशासन देण्यास मदत करतात. प्रशासनामध्ये वेळेनुसार व परिस्थितीनुसार बदल घडविणे आवश्यक असते. नागरिकांना प्रशासकीय सुविधा प्रधान करताना नागरिकांच्या समस्यांचा विचार करून प्रशासनाला स्वतःमध्ये बदल घडवून आणावा लागतो. प्रशासनातील सुधारणा प्रामुख्याने प्रशासनांमधील दोष दूर करून प्रशासन हे सुलभ व पारदर्शक व्हावे हा मुख्य उद्देश असतो. या सुधारणा मुख्यतः सरकारी यंत्रणेतील गैरकारभार, विलंब, अपव्यय आणि अपारदर्शकता कमी करण्यासाठी केल्या जातात. ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोशानुसार,'प्रशासकीय सुधारणा म्हणजे लोकप्रशासनामध्ये अधिक चांगल्या व सुधारित स्वरूपामध्ये बदल करणे होय.' प्रशासन हे सुलभ, स्वच्छ व पारदर्शक करणे होय.

**<u>प्रशासकीय सुधारणांचा उद्देश:</u>**

लोक कल्याणकारी राज्यात प्रशासन हे जनताभिमुख व्हावे या उद्देशाने प्रशासनात सुधारणा घडवून आणल्या जातात. या प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्याचा मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे असतो.

1. प्रशासकीय कार्यक्षमता वाढवणे –

सरकारी प्रशासन नेहमीच खाजगी प्रशासनापेक्षा संथगतीने काम करीत असते. प्रशासनातील कार्यक्षमता वाढविणे व सरकारी यंत्रणांची गती आणि परिणामकारकता सुधारणे हा प्रशासकीय सुधारणांचा उद्देश आहे.

2. प्रशासनात पारदर्शकता आणणे –

भारतीय प्रशासनात सुधारणा घडवून आणताना सर्वात मोठे आवाहन म्हणजे प्रशासनात पारदर्शकता आणणे. देशातील नागरिकांनी प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हावे. नागरिकांना प्रशासनाची कार्यपद्धती कळावी. यासाठी प्रशासकीय सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. त्यासाठी निर्णय प्रक्रियेतील गुप्तता कमी करून माहिती लोकांसाठी खुली करणे अनिवार्य आहे.

3. भ्रष्टाचार मुक्त प्रशासन –

सुरुवातीपासून भ्रष्टाचार हे प्रशासनातील सर्वात मोठे आव्हान आहे. भारतीय प्रशासनात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आढळून येतो. प्रशासकीय कार्य करीत असताना अनेक प्रकारचे गैरव्यवहार आणि अपप्रवृत्ती आढळून येतात. भ्रष्टाचार निर्मूलन करण्यासाठी प्रशासनात बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

4..उत्तरदायित्व वाढवणे –

प्रशासकीय उत्तरदायित्व वाढविणे हा प्रशासकीय सुधारणांचा मुख्य उद्देश आहे. लोक कल्याणकारी राज्यात प्रशासन हे जबाबदार व उत्तरदायी असणे आवश्यक आहे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाबद्दल तो स्वतः जबाबदार धरला जातो. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी अधिक जबाबदारीने आपले काम पूर्ण करतात..

5. प्रशासनात लोकसहभाग वाढवणे –

प्रशासनात सुधारणा घडवून आणण्याचा आणखी एक उद्देश म्हणजे प्रशासनात लोकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविणे होईल. लोकप्रशासनात जनतेचा सहभाग वाढला की प्रशासन जनताभिमुख होते. नागरीकांना प्रशासनात अधिक सहभागी करून घेणे हा प्रशासकीय सुधारणांचा उद्देश आहे.

**भारतीय स्वातंत्र्यानंतर प्रशासकीय सुधारणा**:

ब्रिटिश राजवटीत भारतात विविध कायद्यांच्या माध्यमातून प्रशासकीय सुधारणा करण्यात आल्या. 1919 व 1935 च्या प्रशासकीय सुधारणा कायद्यानुसार प्रशासनात सुधारणा घडवून आल्या. ब्रिटिश सरकारने आपली राजवट टिकविण्यासाठी भारतीय प्रशासनामध्ये विविध सुधारणा केल्या. भारत स्वतंत्र झाल्यानंतर प्रशासनात अनेक बदल घडून आलेत. ब्रिटिश राज्यकर्ते भारतातून निघून गेल्यानंतर स्वतंत्र भारताच्या नवीन सरकारपुढे नवीन प्रशासकी आव्हाने उभी राहील. ही आव्हाने हाताळण्यासाठी व सक्षम प्रशासन निर्माण करण्यासाठी प्रथमच प्रशासनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने प्रयत्न सुरू झाले. भारतीय पोलीस दल, भारतीय परराष्ट्र विभाग तसेच केंद्रीय सेवा व नागरी सेवा यामध्ये बदल करून भारतीय प्रशासकीय सेवा स्वीकारण्यात आले. प्रशासकीय अधिकाऱ्यांकरिता भारतात प्रशिक्षण केंद्र सुद्धा उघडण्यात आलेत. भारतीय स्वातंत्र्यानंतर प्रशासनात पुढील सुधारणा झालेले दिसून येतात.

1. 1947 मध्ये गोपाल स्वामी अय्यंगार समितीने केंद्र शासन यंत्रणेच्या कामाचा व्यापक आढावा घेतला आणि शासन संस्थेतील बदल, शासन कामकाजाच्या व्यवहाराच्या पद्धतीमध्ये सुधारणा व्हावी असे म्हटले. त्यांनी मंत्रालय आणि विभाग यामध्ये फरक करण्याची शिफारस केली.
2. 1953 मध्ये भारतातील लोकप्रशासन सर्वेक्षण अहवालामधील पहिला अहवालामध्ये केंद्र शासनामध्ये संघटना आणि कार्यपद्धती संस्था आणि लोकप्रशासन संस्था स्थापन करावी अशी शिफारस करण्यात आले. ही शिफारस ताबडतोब मान्य करण्यात आली. 1954 मध्ये भारतीय लोकप्रशासन संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेकडे संशोधनात्मक अभ्यास करणे, मार्गदर्शनासंबंधीची विविध कामे करणे व वरिष्ठ नागरिक सेवकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे अशा पद्धतीची कामे देण्यात आली.
3. प्रशासना पुढील सर्वात मोठे आव्हान म्हणजे भ्रष्टाचार यावर मार्ग काढण्यासाठी 1964 मध्ये संथानम समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने केंद्रीय मंत्रालय आणि विभागांमधील संघटना आणि तेथील दक्षता विभागांच्या कामकाजाचे परीक्षण केले व सेवक प्रशासनामध्ये नवीन नियमानबद्दल शिफारशी सुचवल्या.
4. 1966 मध्ये मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणा आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या स्थापनेमुळे कायदा आणि सुशासन सांभाळणारे संस्था ते विकासासाठी जबाबदार असणारी यंत्रणा असा बदल प्रशासनाच्या स्वरूपामध्ये झालेला दिसतो. प्रशासकीय सुधारणा आयोगाने चार वर्षाच्या कालखंडानंतर एकूण 581 शिफारशी केल्या. यामध्ये प्रामुख्याने 1. भ्रष्टाचारा संबंधित तक्रारी वर कारवाई करण्यासाठी लोकपाल आणि लोकायुक्त यांची नियुक्ती करणे. 2. राज्यघटनेतील कलम 263 नुसार केंद्र राज्य संबंध हाताळणे. 3. प्रत्येक मंत्रालयात स्वतंत्र कर्मचारी विभाग स्थापन करणे. 4. नागरी सेवकांच्या तक्रार निवारणासाठी प्रशासकीय न्यायाधिकरनाची स्थापना करणे. 5. मंत्री आणि नागरी सेवक संबंधांमध्ये सेवेचे अराजकीय करण करणे. अशा विविध शिफारशी होत्या.
5. सतीश चंद्र समितीने 1989 मध्ये प्रशासकीय सुधारणा अहवाल सादर केला. त्यानुसार 1993 पासून नागरी सेवा परीक्षांमध्ये बदल करण्यात आले. ज्यामध्ये निबंध प्रश्नपत्रिका चा प्रारंभ करण्यात आला.
6. 1981 मध्ये राष्ट्रीय पोलीस आयोगाच्या शिफारशीनुसार पोलीस यंत्रणेचा गैरवापर आणि पोलिसांची कार्य व उत्तरदायित्व निश्चित करण्यात आले.
7. 1990 च्या दशकांनंतर प्रशासनात 73 व्या व 74 व्या घटनादुरुस्तीने महत्त्वाचे बदल सुचवले. पंचायत राज संस्था आणखी विकसित करून तिच्या अधिकाराची विकेंद्रीकरण करण्यात आले.

8. 2004 मध्ये शासनाने नागरी सेवा सुधारणा होटा समिती च्या शिफारशीनुसार सर्व वरिष्ठ पदांचे कर्तव्य कार्य आणि जबाबदाऱ्या नमूद करणे आणि लोकांपर्यंत पोहोचविणे अनिवार्य केले. शासनाचे कालबाह्य नियम आणि पद्धती बदल करून त्या जागी नव्या व सुलभ अशा नियमांचा समावेश करण्यात आला.
9. 31 ऑगस्ट 2005 रोजी वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखालील भारतात दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग स्थापन करण्यात आला. भारतातील लोकप्रशासन व्यवस्था पुनरुजीवीत करण्याच्या उद्देशाने या आयोगाने एक रूपरेषा तयार केली. या आयोगाच्या शिफारशीनुसार भारतात राष्ट्रीय लोकप्रशासन संस्थेची स्थापना करण्यात आली. अनारक्षित इतर मागासवर्गीय अनुसूचित जाती जमाती व शारीरिक अपंगत्व उमेदवारांसाठी परीक्षेसाठी प्रयत्न निश्चित करण्यात आले. या आयोगाने भ्रष्टाचारा संबंधी खटल्यांच्या कार्यवाहीवर देखरेख करण्यासाठी लोकायुक्त यांची सबलीकरण करण्यात यावे अशी शिफारस केली. प्रशासनातील सर्व कार्यालयांनी लोकांशी अधिकाधिक संपर्कात यावे यासाठी ऑनलाईन वेध घेणारी यंत्रणा असावी अशी सुद्धा शिफारस करण्यात आली. 2005 च्या माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी व्हावी अशी शिफारस करण्यात आली.
10. 2006 मध्ये राष्ट्रीय ई-अभिषाशन योजनेला मान्यता देण्यात आली. या योजनेनुसार केंद्र शासन, राज्य शासन, जिल्हा प्रशासन आणि पंचायती अशा सर्वच ठिकाणी माहिती आणि सेवांबाबत एकल खिडकी पद्धतीने माहिती पुरवली जावी आणि ही माहिती नागरिक, व्यापारी आणि परदेशी भारतीय अशा सर्वांना उपलब्ध असेल असे मान्य करण्यात आले.

**निष्कर्ष:**

भारतीय प्रशासनात बदलत्या काळानुसार अनेक बदल आणि सुधारणा करण्यात आल्या आहे. भारतातील सार्वजनिक प्रशासकीय सेवांमध्ये गतिशीलता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांचे पुनराभिमुख करण्याच्या उद्देशाने काही महत्त्वाची पावले शासनाने उचलली. भारतीय प्रशासना पुढील विविध आव्हाने उभे होते ज्यामध्ये पारंपारिक प्रशासन व्यवस्था, भ्रष्टाचार, प्रशासनातील विविध दोष ज्यामध्ये दप्तर दिरंगाई, पदाचा गैरव्यवहार, राजकीय हस्तक्षेप इत्यादी. भारतीय शासन व्यवस्थेने या सर्व आव्हाने आणि दूर करण्यासाठी प्रशासनात वेळोवेळी सुधारणा केलेले आहे. सर्वप्रथम लोकप्रशासनाला उत्तरदायी आणि नागरिकांशी स्नेहपूर्ण संबंध असलेले बनविणे हा प्रमुख उद्देश्य होता. त्याचबरोबर प्रशासनामध्ये पारदर्शकता आणणे आणि भ्रष्टाचारा मुक्त प्रशासन करणे हा उद्देश्य समोर ठेवून प्रशासनात सुधारणा करण्यात आल्या आहेत. प्रशासनामध्ये अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे, प्रशासनात लवचिकता आणणे, प्रशासनात नागरिकांचा सहभाग करून घेणे, नागरी सनद याची अंमलबजावणी करणे, इ-प्रशासन याची अंमलबजावणी करणे आणि भ्रष्टाचारावर लक्ष ठेवण्यासाठी लोकपाल आणि लोकायुक्तांची नियुक्ती करणे अशा पद्धतीची सुधारणा होणे आवश्यक आहे.

**संदर्भ:-**


1. Maheshwari S. R.,'Administrative reform in India', Macmillan Publication New Delhi,2002
2. M.Laxmikant, Public administration, Mc Grew Hill Publication Noida,2020
3. Prof. B. L Fadiya & Kuldeep Fadiya, Public Administration, Sahitya Bhawan Publication Aagra, 2023
4. बिद्युत चक्रवती आणि प्रकाश चंद्र, 'जागतिकीकरणातील लोकप्रशासन', SAGE प्रकाशन नवी दिल्ली, 2018
5. प्रा. बी. बी. पाटील, लोकप्रशासन, फडके प्रकाशन कोल्हापूर, 2022